1995 (411)

# शाळेतल्या आंबट - गोड आठवणी



डॉ. जयंत नारळीकर

प्रत्येकाच्या आयुष्यात शालेय जीवना विषयीच्या कडू व गोड आठवणी असतात. प्रस्तुत लेखात बिगरी ते मॅट्रिक या शालेय शिक्षणाचा आलेख डॉ. जयंत नारळीकर यांनी रेखाटला आहे.

एखाद्या विद्यार्थ्यामध्ये बुद्धीमत्तेची चमक दिसल्यास पालक, शिक्षक, मुख्याध्यापक त्या विद्यार्थ्याला कसे घडवतात याची अनुभूती या लेखातून येते.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यात पालक, शिक्षक यांचा कळत-नकळत का होईना खारीचा/सिंहाचा वाटा असतो. हे नाकारता येणार नाही. हीच बाब प्रस्तुत लेखात डॉ. नारळीकरांनी थोडी विनोदी ढंगात सांगितली आहे.

बिगरी ते मॅट्रिक मी बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या आवारात शाळेत गेलो. त्या ''युनिव्हर्सिटी चिल्ड्रेन्स स्कूल'' चे आता केंद्रीय विद्यालय झाले आहे. पण १९४३-५३ च्या दशकात ती शाळा लहानच होती. मी प्रवेश केला तेव्हा चौथी पर्यंतच होती. पण मी तिसरीत गेलो, तेव्हा पाचवीचा वर्ग नव्याने आला. आणि असेच दरवर्षी एक एक वर्गाने वाढत शाळा दहावी म्हणजे मॅट्रिकला जाऊन भिडली तेव्हा मी आठवीत गेलो होतो.

''इंफट्रस क्लास'' मधून दोनतीन महिन्यातच मला पहिले ''डबल प्रमोशन'' मिळाले. पण पहिलीचा अभ्यास अवघड वाटला असावा... किंवा मी लक्ष देऊन केला नसावा. एवढे मात्र आठवतेय की माझे वडील आणि मी मे महिन्यातल्या एका सकाळी रणरणत्या उन्हातून सायकल रिक्षाने शाळेत गेलो, रिझल्ट आणायला. परत येताना वडिलांनी निकाल वाचून दाखवला. माझा आठवा नंबर आला हे सांगताना त्यांचा आवाज थंड होता. पण बरोबर एक वर्षाने पुन्हा हाच कार्यक्रम झाला तेव्हा त्यांनी उत्साहाने सांगितले ''तू पहिला आलास''

तिसरीत आजारपणामुळे पहिला नंबर हुकला. पण चौथी पासून कायम झाला. आणि ''मॉनीटर'' ''प्रिफेक्ट'' सारखी बिरूदे चिकटू लागली. पण एका प्रसंगाने जाणीव करून दिली की ह्या अधिकारांबरोबर जबाबदारी पण वाढते.

मला वाटते सहावीतली गोष्ट असेल. शेवटचा ड्रीलचा तास व आम्ही मास्तरांची वाट बघत होतो. ते पाच मिनिटे झाली तरी आले नाहीत तेव्हा एक मुलगा चौकशी करायला गेला. आणि उलट पावली परत आला आनंदी चेहऱ्याने. 'मास्तर आज आलेच नाहीत..... तेव्हा हा तास होणार नाही'' वाक्याचा उत्तरार्ध म्हणजे त्याचे स्वतःचे मत होते हे विचारात न घेता सर्व मुले दप्तरे घेऊन घराकडे पळाली. मी पण घरचा मार्ग धरला. अनपेक्षितरित्या शाळा लवकर सुटल्याचा आनंद सर्वांनाच होता.

पण दुसऱ्या दिवशी त्या आनंदावर विरजण पडले. हेडमास्तरांनी मला बोलावले आणि लवकर का गेलास म्हणून जाब विचारला. ''सर, ड्रीलचे सर आले नाहीत व शेवटचा तास होता म्हणून आम्ही सगळेच गेलो.'' ''पण तू प्रिफेक्ट आहेस. क्लास सोडताना वर्ग शिक्षक किंवा मला विचारायला हवे होतेस. तुझ्यापासून ही अपेक्षा नव्हती.'' त्यांनी सौम्य पण स्पष्ट शब्दांत बजावले.

मी आठवीत असतांना गणिताचे शिक्षक आले नाहीत, म्हणून हेडमास्तरांनी एक दिवस प्रायमरी क्लासेसना गणित शिकविणारे शिक्षक वर्गात पाठवले. त्यांना आम्ही ''भाखामास्टर'' म्हणून ओळखायचो. ते खेड्यातले असून त्यांचे बोलणे चालणे ''गावठी'' होते. म्हणून आम्ही मुलं आडून त्यांची टर उडवायचो. पण आम्हाला त्यांनी शिकवायला यावे असे पूर्वी कधी घडले नव्हते. कारण आम्ही होतो सेकंडरीतले. त्या दिवशी सुद्धा हे प्रायमरी सर आम्हाला काय शिकवणार असा एक हेटाळणीवजा विचार मनात आला.

पण भाखामास्टरनी आम्हाला त्या दिवशी पूर्ण चीत केले. "चला तुम्हाला गणिते घालतो ते म्हणाले, ''सर अल्जिब्रा का जॉमेट्री?'' एका जादा मुलाने विचारले. "साधे सोपे अंक गणित-ॲरिथमेटिक..... बघुया कशी सोडवता ते.''

मला वाटते त्यांनी तीन गणिते घातली आणि आम्हाला कोणालाच ती सोडवता आली नाहीत. मी जरा शेखीने ती अल्जिब्रा वापरून सोडवायला गेलो ते समीकरणात रूतून बसलो. शेवटी वर्ग संपता संपता भाखामास्टरनी उत्तरे सांगितली. केवळ अंकगणितातल्या खुब्या वापरून त्यांनी ती चुटकीसारखी सोडवली.....

आणि आम्हा "सेकंडरीवाल्यांचा'' नक्षा पार उतरवला.

दहावीतली सहामाही परीक्षा म्हणजे मॅट्रिकची रंगीत तालीमच. माझी हिंदीची उत्तरपत्रिका खुद्द हेडमास्तरांनी तपासली होती. मला १०० पैकी ६५ मार्क मिळाले होते व ते वर्गात सर्वात जास्त होते. पण माझ्या समाधानावर पाणी सोडत हेडमास्तर म्हणाले'' जयंत, अशा तयारीवर तुला मॅट्रिकमध्ये डिस्टिंक्शन (१०० पैकी ७५) मिळणार नाही.''

मला आश्चर्य आणि वाईट दोन्ही वाटले. हिंदी हा विषय असा की ज्यात मार्क द्यायला परीक्षक कंजूषी करतात ही ख्याती. ''सर, हिंदीत डिस्टिंक्शन कसे मिळेल ? मार्क फार कापतात तिथे,'' मी उत्तरलो. "अवघड आहे पण अशक्य नाही. तू अधिक प्रयत्न करावास इतकी तुझी तयारी आहे.'' असे म्हणून त्यांनी काही सुधारणा आणि तयार कशी करावी ते सांगितले.

मॅट्रिकचा निकाल जाहीर झाला तो सांगायला माझे वसंतमामाच आले. "पहिल्या नंबराबद्दल अभिनंदन'' .. ते काय म्हणताहेत हे डोक्यात घुसायला वेळ लागला. पण आमच्या शाळेतला मी पहिला विद्यार्थी मॅट्रिक सर करणारा. याचा मला आनंद झालाच पण त्यांत विशेष भर पडली जेव्हा मामांनी मला डिस्टिंक्शन मिळालेल्या विषयात उल्लेख केला हिंदीचा.

*डॉ. जयंत नारळीकर हे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ आहेत. खगोल शास्त्राचा त्यांचा अभ्यास उल्लेखनीय आहे. डॉ. नारळीकरांनी विज्ञान विषयात ज्याप्रमाणे चिंतन, मनन, लेखन केले आहे, त्याचप्रमाणे लहानग्या मराठी मुलांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी म्हणून लहान मित्रांसाठी देखील विपुल लेखन केले आहे.*